रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग

मराठी राजभाषा दिन अहवाल

दि.२८ फेब्रुवारी २०२०

दि.२७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस हा 'मराठी राजभाषा दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. यामध्ये कवी कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ.सिंधू आवळे यांनी मराठी राजभाषा दिनाचे महत्त्व व कुसुमाग्रजांचे मराठी साहित्यातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.आवळे म्हणाल्या की, "मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. आपण तीचे संवर्धन करणे गरजेचे आहे. इतर भाषा आपण जरूर आत्मसात करा परंतु मातृभाषेला आंतर देऊ नका. कुसुमाग्रजांसारख्या  जेष्ठ साहित्यिकांनी मराठी भाषेची सेवा केली आहे, त्यांनी त्यांच्या लेखनातून मराठी भाषेचे संवर्धन केले." अशा प्रकारे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

दि.२८ रोजी सकाळी महाविद्यालयातील मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'परिमल' या भित्तीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आर.एस.डुबल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कला शाखेचे प्रमुख डॉ.संजय साठे तसेच विज्ञान शाखेचे प्रमुख डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार उपस्थित होते. या 'परिमल' अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मराठीतील नामवंत साहित्यिकांची माहीती संग्रहीत केली व त्याचे संपादन करून प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रा.अंकुश घुले यांनी आभार व्यक्त केले. तसेच या मराठी राजभाषा दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेसाठी 'मराठी असे आमुचि माय बोली', 'मातृभाषा ते ज्ञानभाषा मराठी', 'मराठी भाषेपुढील आव्हाने', 'मराठी भाषेची बलस्थाने', मराठी भाषा संवर्धनात लोकसाहित्याचे योगदान' इ. विषय ठेवण्यात आले होते. या स्पर्धेमधून प्रथम क्रमांक चि.सौरभ चव्हाण, दुसरा क्रमांक कु.धनश्री कांबळे तर तृतीय क्रमांक चि.अक्षय कांबळे  यांनी पटकावला. या विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.साळुंखे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. हा मराठी राजभाषा दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश साळुंखे, उपप्राचार्य डॉ.आर.एस.डुबल यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

प्रा.डॉ.सिंधू आवळे

प्रमुख, मराठी विभाग